# BDC LIBRARY

## News Paper Clipping

## A.Y. 2025-26

कृष्णा एक्सप्रेस
www.krishnaexpress.in
02 Mar 2026 - Page 3 वार - सोमवार

# रोजगार मागण्यापेक्षा रोजगार देणारे व्हा : विक्रमसिंह पाटणकर



(सुरेश संकपाळ)

पाटण : महाविधालयातील विधार्थी शिक्षण घेत असताना करीयर घडविण्यासाठी योग्य मार्गदर्शनाच्या शोधात असतो . त्याला पाटण महोत्सवा मध्ये विविध स्टॉल हे योग्य मार्गदर्शन करण्यास फायदेशीर ठरतील. त्यातून त्यांनी प्रेरणा घेऊन आपला स्वताचा व्यवसाय निर्माण करावा. या पाटण महोत्सवामुळे रोजगार निर्मितीला चालना मिळेल विद्यार्थीनी रोजगार मागण्यापेक्षा रोजगार निर्मिती देणारे झाले पाहिजे असे प्रतिपादन राज्याचे माजी सार्वजनिक बांधकाम मंत्री विक्रमसिंह पाटणकर यांनी पाटण महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी केले.

यावेळी कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ ज्ञानदेव मस्के, कोयना एज्युकेशन सोसायटीचे जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर, जॉईंट सेक्रेटरी डॉ सुहास देशमुख ,संचालक याज्ञसेन पाटणकर, संजीव चव्हाण, दादासाहेब जाधव, शरद देशमुख, पृथ्वीराज पाटील कॉलेजचे प्रभारी प्राचार्य डॉ विलास कळंत्रे ,डॉ हेमलता काटे आणि पाटण पाटण महोत्सव समिती सदस्य उपस्थित होते.

विक्रमसिंह पाटणकर पुढे म्हणाले की. छोटे छोटे उद्योगातन मोठा उद्योग निर्माण होत असतो. सुरुवातीला लहान उद्योगापासून सुरुवात करावी. स्वयं निरीक्षण, अनुभव यातून आपला नवीन उधोग उभा करावा. उद्योग वाढवून आपल्यासोबत समाजाची प्रगती करावी . उद्योगाच्या माध्यमातून रोजगार कसा निर्माण होईल याकडे देखील आपण लक्ष दिले पाहिजे. पाटण तालुक्यात वन पर्यटनामध्ये मोठी संधी आहे. स्थानिक युवकांनी याचाही फायदा करून घेऊन घ्यावा. यावेळी विधार्थी तालुक्यातील विविध संस्थाचे पदाधिकारी ,परिसरातील शेतकरी ,महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.